# जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा

## -:: दरपत्रक सुचना ::-

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा या आस्थापनेवरील नक्कल व अभिलेख, विभाग, मुददेमाल विभाग, ग्रंथालय विभाग येथे "किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषधी फवारणी" करण्याकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे. करीता ज्यांना औषधी फवारणीबाबतचे दरपत्रक दाखल करावयाचे आहेत, त्यांनी आप-आपले दरपत्रक सिलबंद लिफाफ्यामध्ये आवश्यक त्या सर्व दराने विवरणासह जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील कार्यालयात दि. २०/०६/२०२६ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. तसेच दरपत्रकाच्या लिफाप्यावर "किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषधी फवारणी" असे ठळक अक्षरात लिहावे.

### किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषधी फवारणी दरपत्रकाच्या अटि व शर्ती खालीलप्रमाणे:

१) दरपत्रकावर "किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषधी फवारणी" असे ठळक अक्षरात लिहावे तसेच दरपत्रक पाठवणाऱ्या संस्थेचे/पुरवठादराचे/व्यक्तीचे नाव, पत्ता व मोबाईल नंबर स्पष्ट ओळखता येईल अशा प्रकारे लिहावे.

२) वेळेनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

३) दरपत्रकामध्ये किटकनाशक व वाळवीनाशक औषधी फवारणीचे दर प्रती चौ. फुट या प्रमाणे स्पष्टपणे दर्शविण्यात यावे.

४) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील आस्थापनेवर तसेच अंतर्गत तालुका न्यायालये व ग्राम न्यायालये, (देवळी, सेवाग्राम, अल्लीपुर) येथे आवश्यकता असल्यास दरपत्रकातील नमुद तसेच मंजुर दरानुसारच आपणास वाळवी किटकनाशक औषध फवारणी करुन दयावी लागेल.

५) दरपत्रक मंजुर किंवा नामंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा अंतर्गत गठीत स्थानिक खरेदी समितीला राहिल.

६) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील औषध फवारणीबाबतचा कालावधी हा सन २०२६-२०२७ करीता (करार झाल्यापासुन पुढील १ वर्षाकरीता) राहिल.

७) सादर केलेले दरपत्रक मंजुर झाल्यानंतर तसेच औषध फवारणी केल्यानंतर औषध फवारणी केल्याबाबतचे सहा महिन्याचे देयके या कार्यालयास सादर करावे लागेल व त्यासोबत फवारणी केल्याचे क्षेत्रफळ फुटासह फवारणी केल्याचे संबंधीत आस्थापनेकडुन स्वाक्षरीसह माहिती सादर करावी लागेल त्यानंतरच देयकाबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

८) दरपत्रक मंजुर झाल्यानंतर आस्थापनेवर वाळवी औषध फवारणी करण्याकरीता दुरध्वनीव्दारे कळविल्यानंतर सांगितलेल्या दिवशी/ठिकाणी औषध फवारणी करुन दयावी लागेल.

९) किटकनाशक फवारणीचे काम हे समाधानकारक नसल्यास सदर फर्मकडुन/संस्थेकडुन/व्यक्तीकडुन पुन्हा औषध फवारणी करावी किंवा कसे? याबाबत निर्णय घेण्याचा सर्वस्वी अधिकारी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा यांना राहिल.

१०) दरपत्रकातील दर हा सर्व करांसह नमुद असलेले दराचा उल्लेख करावा.

स्वा./-
(हिमंत भ. गायकवाड)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा.

पृष्ठांकण क्र.२६८३ /वाळवी किटकनाशक फवारणी/२०२६.
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.
दिनांक :१२ /०६/२०२६.
प्रतीलीपी माहीतीस व योग्य कार्यवाहीस सादर :
१) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
२) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३) तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४) जिल्हा परीषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५) नगर परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६) सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
७) जिल्हा संगणक प्रणाली, संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.

दिनांक : १२/०६/२०२६.

प्र. प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा.